**नि.फौ.ख.क्र. ५६/२०२४**
**निशाणी क्र.१६/क**
सरकार वि. करण दत्ता मोहिते पाटील

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ ची जबाणी,</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,
**माझे नाव:** अमोल हनुमंत राठोड,
**वय:** २९ वर्षे, **व्यवसाय:** पो.ह., गुन्हे प्रकटीकरण शाखा,
**पत्ता:** खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड.

**<u>सरतपास फिर्यादी तर्फे वकील श्री. विलास गवई यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१)** सन २०१९ पासून मी गुन्हे प्रकटीकरण शाखा, खोपोली येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहे. दि. २३/०३/२०२४ रोजी रहाटवडे भागामध्ये पेट्रोलिंग करत असताना एक इसम चालत येताना दिसला. माझ्या सोबत त्यावेळी पोलीस व्हरांबळे, के. डी. देवकाते व जाधव होते. तो इसम रहाटवडे गावातील विसर्जन घाटावर हातात लांबट वस्तू लाल कपड्यामध्ये बांधलेली दिसून आली. त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो थांबला नाही म्हणून मी व पोलीस व्हरांबळे यांनी त्याला जागीच पकडला. त्यावेळी सायंकाळचे ०७:३० वाजले होते. त्या लाल कपड्यामध्ये लोखंडाची तलवार दिसून आली. त्या तलवारीची मुठ पिवळ्या धातुची होती व त्यावर मोठ्या अक्षरात जय शिवाजी असे लिहीलेले होते. ती लवार थोडी गंजलेली होती. त्याची लांबी अंदाजे ३२ इंच होती. त्या इसमाला त्याचे नाव विचारले असता त्याने करण दत्ता मोहीते पाटील असे सांगितले. राहणार रहाटवडे असे सांगितले. त्याला तलवारीची पावती आहे का असे विचारले असता त्याने पावती नाही असे सांगितले.

**२)** व्हरांबळे साहेबांनी दोन पंचांना बोलावून घेतले व जागीच पंचनामा केला व तलवार जप्त केली. त्यावेळी पंच जावेद नदाफ व दुसरे पंच सुनिल तायप्पा काळे होते. मी पोलिस स्टेशन मध्ये येवून आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवली त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादीस **निशाणी १७** व छापील प्रथम खबरी अहवालास **निशाणी १८** देण्यात येत आहे. आता मला जप्त करण्यात आलेली तलवार दाखवली ती तीच

असून तिला **आर्टीकल ए** देण्यात येत आहे. त्याच्या ताब्यातून तलवार जप्त केली. त्या आरोपीला मी ओळखतो. तो आरोपी आज न्यायालयात हजर नाही. त्याला पाहील्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीच्या विधिज्ञ श्रीमती अंकीता अनिलकुमार पुळेकर यांच्यामार्फत सुरु.</u>**

**३)** हे म्हणणे खरे आहे की, मी खोपोली येथे २०१९ पासून नोकरीला असल्याने मला खोपोली परीसराची संपूर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या शेजारील रस्ता रहदारीचा आहे. हे मला आठवत नाही की, दि. २३/०३/२०२४ रोजी रविवार होता, दि. २४/०३/२०२४ रोजी होळी होती व दि. २५/०३/२०२४ रोजी धुलिवंदन होते. हे म्हणणे खरे आहे की, घ टनास्थळाच्या चतु:सीमेध्ये नमूद असणारा पुर्वेकडील रस्त्यावरुन लोक ये—जा करतात. घटनास्थळाशेजारी बंद पडलेली कंपनी आहे. हे म्हणणे खरे नाही की, विसर्जन घाट असल्यामुळे घटनास्थळावर झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घ टनास्थळाच्या रस्त्यावरुन लोकांची वाहतुक चालू असते. मला खाजगी वाहनाचा नंबर सांगता येणार नाही.

**४)** पंच जावेद नदाफ हे वासरंग येथे राहतात व दुसरे पंच सुनिल काळे हे काजुवाडी येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, जप्त तलवारीसारख्या तलवारी भांड्याच्या दुकानात विकत मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

**उलट तपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
माझे समक्ष,

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.03.09 16:14:11 +0530

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खालापुर.

ठिकाण:— खालापुर,
दिनांक:— ०९/०३/२०२६.